१९२९
. सं. ठाणें
काव्य
२५८

गोविंदाग्रजकृत

७ कविता

मराठी ग्रंथसंग्रहालय
ठाणें.

सं. काव्य
५७३

# कविवर्य गोविंदाग्रज

यांच्या

## निवडक सात कविता.

स्वातंत्र्याचा स्वराज्यरवि जों उदया येईल,
भारतभूची मंगलमयता वहरुनि जाईल !
दिशे दिशेला सत्य चारुता उधळुनि राहील !
भावरसाचा प्रलयपूर नवखंडीं वाहील !
इंग्लंडाचा शेले तेव्हां ताना घेईल !
महाराष्ट्राचा गोविंदाग्रज जागा होईल !

## "गोविंदाग्रजमंडळ"

...मुंबई दादर.

...सन १९२१

किंमत ६ आणे.

REFBK-0001976

# जाहिरात.

## ऐतिहासिक–जुने–लेख.

**पुस्तक १ लें चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहि[ती] व सनदा पत्रें.** या पुस्तकांत बाळाजी आवजी वखंडो बह[ाल] चिटणीस या अद्वितीय पितापुत्रांच्या मुत्सद्दगिरीची व शौर्याची विशेष महत्वाची माहिती असून २० सनदापत्रें सोबत दिलीं आहेत. मूळ किं. ४ आणे. प्रति थोडयाच असल्यामुळें किं. ८ आणे ठेविली आहे. ट. ह. निराळा.

**पुस्तक २ रें**—या पुस्तकांत पेशव्यानें चिटणीस घराण्यास सत्ताहीन करून त्यांचीं वतनें पेशव्यांच्या दरबारानें खालसा कशी केलीं याचें दिग्दर्शन असून ३३ याद्या पत्रें सोबत दिलीं आहेत. किं. ८ आणे. ट. ह. निराळा.

ह्या दोन्ही पुस्तकांवर विद्वानांचे उत्तम अभिप्राय आलेले आहेत. ऐतिहासिक दृष्टयाही पुस्तकें संग्रही ठेवणें अवश्य आहे.

**पुस्तक ३ रें**—चां. का. ज्ञातिसंबंधीं महत्वाचीं आज्ञापत्रें वगैरे किं. १२ आणे.

**पुस्तक ४ थें**—छापत आहे ( लौकरच प्रसिद्ध होईल )

**बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी.**

पाध्येबिल्डींग, दादर मुंबई नं. १४

---

हें पुस्तक खेमराज श्रीकृष्णदास यांनीं मुंबई खेतवाडी ७ वी गल्ली खम्बाटा लेन येथें आपल्या 'श्रीवेंकटेश्वर' स्टीम् प्रेस मध्यें छापिलें आणि मोरेश्वर बाळकृष्ण देशमुख यांनीं दादर येथें प्रकाशित केलें.

२६८

# गोविंदाग्रजांच्या सात निवडक कविता !

## अनुक्रमणिका-


| कविता. | पृष्ठ. |
|---|---|
| १ श्रीमहाराष्ट्रगीत | १ |
| २ हालत्या पिंपळपानास | ४ |
| ३ चिमुकली कविता | ७ |
| ४ कोकीळ | १२ |
| ५ कलगीचें गाणें | १५ |
| ६ प्रेमाचा प्रळयकाळ | २० |
| ७ पहिलें चुंबन | २३ |

# प्रकाशकाचे दोन शब्द.

जेथें सर्वच सारखें सर्वांगसुंदर तेथें निवडणूक तरी कसली करावयाची आहे ? गोविन्दाग्रजांचें काव्योद्यान इथून तिथून सारख्याच सुगंधी सुमनांनीं सजलेलें; असल्या या बहरलेल्या जादूच्या बागेंतून आज कविरायाच्या दुसऱ्या पुण्यतिथीचे दिवशीं चार फुलें खुडून महाराष्ट्रीय जनतेला अर्पण करण्याचें गोड काम करितानां "गोविन्दाग्रज मंडळाला" होणारा आनंद व्यक्त करून दाखविणें अशक्यच आहे. रा. रा. नातु व रा. रा. उपासक यांनीं अनुक्रमें ६ व ९ कवनें प्रसिद्ध करून अगोदरच रसिकांस ऋणी करून ठेविलें आहे त्यांतच या ७ सुमनांची भर घालण्याचा मंडुळाचा नम्र प्रयत्न आहे. आमची ही अल्पस्वल्प सेवा महाराष्ट्रीय रसिकांनीं गोड करून घ्यावी व मंडळावर नेहमीं कृपादृष्टी असूं द्यावी एवढीच त्यांच्याजवळ विनंती आहे.

प्रस्तुत कविता प्रसिद्ध करण्याची प्रेमळ परवानगी देऊन कवीचे धाकटे बंधु रा. रा. शंकरराव गडकरी यांनीं मंडळावर व प्रकाशकावर अगणित उपकार केले आहेत, तेव्हां नुसते औपचारिक आभारप्रदर्शनानें त्यानीं दाखविलेल्या अत्यंतिक आपलेपणाला बाध आणण्याच्या भलत्या भरीस मी पडतच नाहीं.

पुस्तक वेळेवर, व सुबक छापून दिल्याबद्दल श्रीव्यंकटेश छापखान्याचे मालक शेट रंगनाथ खेमराज यांचेही आम्ही अत्यंत आभारी आहोंत.

मिराज्याची चाळ
दादर, मुंबई.
ता. २३ जानेवारी १९२१

सर्वांचा नम्र सेवक-
**मोरेश्वर बाळकृष्ण देशमुख,**
चिटणीस "गोविंदाग्रजमंडळ"

REFBK-0001976
REFBK-0001976

# ओळख !

कविवर्य **"गोविंदाग्रज"** यांचें खरें नांव **'राम गणेश गडकरी.'** लहान वयांतच इहलोक सोडून गेलेल्या गोविन्द नांवाच्या त्यांच्या धाकट्या बंधू वरील उत्कट प्रेमामुळें त्यांहीं "गोविन्दाग्रज" हें टोपणनांव धारण केलें. यांचा जन्म गुजराथेंत नवसारी येथें इ० स० १८८५ च्या मे महिन्यांत झाला. त्यावेळीं त्यांचे वडील तेथें पोलीसखात्यांत नौकरीस होते. लहानपणापासूनच **"गोविंदाग्रज"** हे फार तीक्ष्ण बुद्धीचे व चलाख होते. वडिलांची नौकरी फिरतीची असल्याकारणानें त्यांच्या प्राथमिक शिक्षणांत बराचसा व्यत्यय आला; तरी अर्धवट घरीं व अर्धवट शाळेंत अशा रीतीनें गुजराथी व मराठी लिहितां वाचतां येण्यांइतकी मजल त्यांहीं आठ वर्षांचे होईपर्यंत मारली. १८९३ सालीं त्यांचे वडील वारले, व त्यानंतर त्यांच्या मातुश्री त्यांनां घेऊन कर्जत येथें राहूं लागल्या. येथेंच **गोविंदाग्रजांचें** मराठी शिक्षण बहुतेक पुरें झालें. त्व्हांपासूनच त्यांना वाचनाची गोडी लागून अभ्यासाव्यतिरिक्त पोथ्यापुराणें वगैरे बरीचशीं पुस्तकें त्यांहीं वाचून टाकलीं होतीं. १९०० च्या सुमारास गडकरी-कुटुंब पुण्यास आलें व येथेंच इंग्रजी अभ्यासास वास्तविक सुरवात करून १९०४ सालीं **गोविंदाग्रज** प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाले व पुढील अभ्यासक्रमाकरितां फर्ग्युसन कॉलेजांत दाखल झाले; परंतु खाजगी वाचनाच्या अनियंत्रित व्यासंगामुळें व इतर कांहीं सांसारिक त्रासांमुळें त्यांच्या अभ्यासक्रमांत व्यत्यय येऊन त्यांना एक दोन वेळां अपयश आलें व त्यांहीं कॉलेज सोडलें आणि किर्लोस्कर नाटक मंडळींतील मुलांनां शिकवावयास शिक्षक म्हणून

राहिलें त्यांच्या या कृत्याच्या योग्यायोग्यतेविषयीं चर्चा करण्याची आपल्याला कांहींच जरूर नाहीं; तथापि येवढें मात्र खरें कीं, गोविंदा-"ग्रजांनीं" नाटय लेखनांत संपादिलेल्या अद्वितीय यशांचें कारण बहुतांशीं ही नोकरीच आहे असें म्हणावयास कोणतीच हरकत नाहीं. सुमारें चार एक वर्षें या कंपनींत राहून नंतर गोविंदाग्रजांनी ही नौकरी सोडली, व कांहीं दिवस 'ज्ञानप्रकाश' ऑफिसांत व नंतर कांहीं दिवस पुण्यास न्यू इंग्लिश स्कूलमधें शिक्षकाची अशा नौकऱ्यांचा थोडथोडा अनुभव घेऊन शेवटीं चाकरी हा आपला धंदा नाहीं हें ठरवून त्यांही नौकरीचा नाद सोडला आणि ज्या उच्च व पवित्र धंद्याकरितां परमेश्वरानें त्यांना निर्माण केलें होतें त्याची दीक्षा घेऊन व ग्रंथकर्तृत्व हाच आपला सर्व व्यवसाय धंदा करून "गोविंदाग्रजांनीं" आपल्या लेखकी आयुष्यास सुरवात केली आणि जवळ जवळ दहा वर्षें वाङ्मय सेवेंत घालविलीं. १९१८ चे अखेरीस त्यांनां मलेरिया तापाचा विकार जडला आणि तोच पुढें विकोपास जाऊन २३ जानेवारी १९१९ रोजीं हा महाराष्ट्राचा शेक्सपीअर सावनेर येथें स्वर्गवासी झाला.

महाराष्ट्रीय वाङ्मयभक्तांस "गोविंदाग्रजांची" ओळख तीन निर निराळया नात्यांनीं आहे:--( १ ) गोविंदाग्रज कवि म्हणून,( २ ) राम गणेश गडकरी नाटककार म्हणून आणि ( ३ ) 'बाळकराम' विनोदी लेखक म्हणून. गडकऱ्यांहीं एकंदर साडेचारनाटकें लिहिलीं आहेत; अठरा नाटकें लिहिण्याचा त्यांचा मानस होता असें म्हणतात; परंतु महा-राष्ट्राच्या दुर्दैवानें ही 'मनांतलीं' नाटकें 'जनांतलीं' होण्यापूर्वींच

क्रूर काळानें आमचें हें कविरत्न हिरावून नेलें. त्यांचें पहिलें नाटक '**प्रेमसंन्यास**' हें होय! हे १९१०-११ ते लिहिलें गेलें; हें सामाजिक आहे. दुसरें '**पुण्यप्रभाव**,' हें १९१७ सालीं रंगभूमीवर आलें. यांतील मुख्य संविधानक जरी कोणत्याही सामाजिक सत्याभंवतीं गुंफलेलें नसलें तरी यांत अनेक सामाजिक तत्वांची चर्चा करण्यांत आली असल्याकारणानें या नाटकास सामाजिक म्हणावयास कोणतीच हरकत नाहीं. तिसरें '**एकच प्याला**' हें १९१९ चे आरंभीं गोविंदाग्रजांच्या मृत्यूनंतर रंगभूमीवर आलें. हें 'दारू' वर लिहिलेलें आहे व याच विषयावर लिहिल्या गेलेल्या इतर सर्व पुस्तकांपेक्षां इष्ट परिणाम घडवून आणण्यांत 'एकच प्याला'च श्रेष्ठ ठरेल एवढेंच या नाटकासंबंधानें सांगितलें म्हणजे पुरें आहे !'**भावबंधन**' हें गोविंदाग्रजांचें चवथें नाटक; आणि नाटक म्हणून यानें या चारही कृतींत पहिला नंबर पटकविलेला आहे. हें एक समाज-चित्र आहे. विनोदाच्या व भाषासौंदर्याच्या जोरावर यानें प्रेक्षकांच्या मनांची चांगलीच पकड घेतली आहे. आतां राहिलेलें अर्धेमुर्धें "**राजसंन्यास**" ! हें संभाजीच्या वेळच्या जित्या महाराष्ट्राच्या इतिहासाचें जातिवंत चित्र होणार होतें. "ना विष्णुः पृथिवीपतिः ।" याचें खरें खुरें आविष्करण होणार होतें; पण त्याचें आतां काय ?

विनोदी लेखक या नात्यानें '**बाळकराम**' नांवाखालीं त्यांहीं "ठकीचें लग्न" "कवींचा कारखाना" "स्वैंपाकघरांतील गोष्टी "वगैरे लेख मनोरंजनांतून प्रसिद्ध केलेले आहेत. याशिवाय दोन 'दीडपानी नाटकें' ही त्यांच्या विनोदी लेखांत लेखावयास कांहीं हरकत नाहीं.

आतां कवि या नात्यानें गोविंदाग्रजांहीं काय काय लिहिलें आहे तें पाहूं या ! गोविंदाग्रजांची स्फुट कवनें जवळ जवळ शंभर एक आहेत; त्यांची साधारणपणें खालीलप्रमाणें विषयवार विभागणी केल्यास फारसे चुकीचें होणार नाहीं:--

१ **प्रेमः**—यांत 'पहिलें चुंबन', 'हृदय शारदेस', 'प्रेम आणि मरण', 'प्रेमपाठ', 'मुरली', चिमुकली कविता', वगैरे वगैरे यांचा समावेश होईल.

गोविन्दाग्रज नुसतें "कामाला प्रेम" समजत नव्हते हें वरील कविता-काळजीपूर्वक वाचल्यास कोणाचेही लक्षांत येईल. त्यांची प्रेमाची कल्पना—मग तें दांपत्य—प्रेम असो अथवा अपत्य-प्रेम असो किंवा इतर कोणतें ही असो—म्हणजे एक अत्यंत पवित्र भावना कीं जिचें पर्यवसान शेवटीं भक्तींतच व्हावयास पाहिजे, अशी होती. 'प्रेमपाठ' "प्रेम आणि मरण, चिमुकली कविता व 'मुरली' यांतील दर्शविलेल्या प्रेमाच्या भावनेला कोणी 'काम' म्हणेल असें मला तरी वाटत नाहीं.

२ **तत्वज्ञान यांतः**—'मुरली', 'कलगीचे गाणें', 'हुरहुर' 'फुटकी तपेली,' 'प्रेमाचा प्रळयकाळ' वगैरे वगैरे गूढ (Mystic.) समजल्याजाण्याऱ्या कविता येतील. गोविन्दाग्रजांनीं आपल्या तत्वज्ञानाची किल्ली मुरलीच्या प्रस्तावनेंतच दाखवून ठेविली आहे. मानवी जीवन सुखमय होण्याला व्यक्तीच्या प्रकृतींत भावना व बुद्धि यांचे योग्य मिश्रण असलें पाहिजे; नुसत्या "शुष्क बुद्धिवादानें जग चालणार नाहीं ! भावनांच्या रसरंगांत बुद्धीचें तेज मिसळलें तरच हृदयाचें समाधान होतें !" हें गोविन्दाग्रजांचें तत्त्व होय.

कित्येक ठिकाणीं तर त्यांनीं भावनेलाच प्राधान्य दिलें आहे. त्यांच्या 'हुरहुर' यां चतुर्दशकांतील खालील दोन ओळीवरून हें स्पष्ट दिसून येईल !

"**बुद्धीला** जिरवीन **भावजलिं**–कीं आशा न मातें दुजी ।
केव्हां **मस्तक** लोपुनी **हृदयिं** या होईल उंची खुजी ? ।"

'मुरलीं' व 'प्रळयकाळ' या वरूनही त्यांचें भावप्रधान तत्वज्ञान उघड होतें.

३ **सामाजिक नीतिः**–'दसरा', 'लीलेस', 'स्मशानांतलें गाणें', वगैरे कवनें यांत येतील.

गोविन्दाग्रजांची सामाजिक मतें दर्शविण्याला त्यांचीं नाटकें चांगलींच खबरदार आहेत, तेव्हां त्याविषयीं आपणांस कांहीं चर्चा करण्याची जरूरच नाहीं.

४ **राष्ट्रीयः**–'श्रीमहाराष्ट्रगीत,' 'भारतवर्षाचा आशिर्वाद', 'पानपतचा फटका' वगैरे यांत येतील.

गडकऱ्यांना राष्ट्रीय कवनें लिहितां येत नव्हतीं असा आक्षेप त्यांच्यावर अनेक वेळां आणिला जातो, परंतु वरील कवनें व 'एकच प्याला' आणि अपुरें 'राजसंन्यास' यांत अंधळ्यासही दिसून येण्याइतकी स्पष्ट असणारी राष्ट्रप्रीती व राष्ट्रीय प्रतिमा कोणासही नाकबूल करतां येणें शक्य नाहीं.

गोविन्दाग्रजांची कविता पूर्ण निराशामय आहे असला एक विलक्षण आक्षेप मधून मधून केव्हां केव्हां ऐकण्यांत येतो, त्यास उत्तर येवढेंच कीं, कोणाही खऱ्या कवीची कोणतीहि खरी कविता खरी खुरी निराशा वादी असणें शक्य नाहीं. सांसारिक व पार्थिव

परिस्थितीमुळें अलौकिक मनांवर सुद्धां अनेकवेळां विषण्णतेंची छटा पसरते, अशा-वेळीं जड जगताविषयीं निराश झालेलें कविमानस आशेला शोधण्याकरितां अनंतांत उडी घेतें, व तेथून आशा-किरणें हुडकून काढून जगतांवर फेंकून देतें. 'शेले, बायरन, गोविंदाग्रज' वगैरेच्या अद्भुत कवनांची जन्म-कथा, हीच होय ! या व्यवसायांत दंग असतांना या महात्म्यांहीं दाखविलेला जड सृष्टि किंवा मनुष्यजाति यां विषयींचा तिटकारा म्हणजे कांहीं निराशावाद नव्हे, आणि असली निराशा देखील गोविन्दाग्रजांच्या काव्यांत फारच क्वचित अढळून येते, ते नेहमीं वाळन गेलेल्या पुष्पाला व त्याचप्रमाणें हृदयाला 'पुनर्विकसना' चाच उपदेश करतांना आढळन येतील ! आणि एकदां दग्ध होऊन गेलेल्या प्रेमाच्या 'पुनर्जीत' अंकुराला हेंच सांगत राहतील कीं–

'विसरुनि जाऊं अनुभव–जाला ।
तूडवूं पायीं चल खेदाला ॥
टाकूं जाळुनि नैराश्याला ।
दुःख सब झूट !॥
चल उघड झांकली मूठ !!!

गोविन्दाग्रजांच्या कवनांतील सौंदर्य गुणग्राहक मराठी रसिकांस दाखविण्याचा प्रयत्न करणें म्हणजें डोळसाला अंधळा समजून त्याचा उपमर्द केल्यासारखें होईल, म्हणून तो प्रयत्नच न करणें बरें !

दादर, मुंबई.
ता० २३ जानेवारी १९२१

[क्ष.]

सं. ग्रा - ८०३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र.१०५
८०३

# १ श्री महाराष्ट्र गीत।

( ही कविता श्री. गोविन्दाग्रजांच्या मृत्यूनंतर सुमारें दीड वर्षानें संदेशच्या 'गडकरी' अंकांत ६ जुलै १९२०--प्रसिद्ध झाली गोविंदाग्रजांची प्रतिभा राष्ट्रीय कवनें लिहिण्यांतही कशी अप्रतिहत होती हें या कवितेवरून स्पष्ट दिसून येतें )

मंगल देशा पवित्र देशा महाराष्ट्र देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा ॥ ध्रु० ॥
राकट देशा कणखर देशा दगडांच्या देशा ।
नाजुक देशा, कोमल देशा फुलांच्याहि देशा ॥
अंजन कांचन करवंदीच्या कांटेरी देशा ।
बकुल फुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा ॥
भावभक्तिच्या देशा, आणिक बुद्धीच्या देशा ।
शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा,
ध्येय जें तुझ्या अंतरीं-निशाणावरी नाचतें करी ।
जोडी इहपरलोकासी ॥
व्यवहारा परमार्थासी-वैभवासि वैराग्यासी ।
जरि पटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा ॥
प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्रदेशा ॥ १ ॥
अपर सिंधुच्या भव्य बांधवा ! महाराष्ट्र देशा ।
सह्याद्रीच्या सख्या ! जिवलगा ! महाराष्ट्र देशा ॥
पाषाणाच्या देहीं वीरसी तूं हिरव्या वेषा ।
गोदा कृष्णा भीमा तुझिया ललाटिंच्या रेषा ॥
तुझिया देहीं करी प्रतिष्ठा प्रथम प्राणांची ।
मंगल वसती जनस्थानिंची श्रीरघुनाथांची ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं ॥ २ ॥

भिन्न वृत्तिचीं भिन्न भिन्न हीं एक जीवसत्वें ।
तुझिया देहीं प्रकट दाविती दिव्य जीवतत्वें ॥
चित्पावन बुद्धीनें करिसी तूं कर्तबगारी ।
देशस्थाच्या खुल्या दिलाची तुजला दिलदारी ॥
कायस्थाचें इमान फिरवी रक्ताचा फेर ।
ठाक मराठी मनगट दावी तुझें हाडपेर ।
ध्येय जें तुझ्या अंतरीं ॥ ३ ॥

ठायीं ठायीं पांडवलेणीं सह्याद्रीपोटीं ।
किल्ले सत्तावीस बांधिले सह्याद्री पाठीं ॥
तोरणगडचा, प्रतापगडचा, पन्हाळगडिचाही ।
बढवय्या झुंझार डोंगरीं तूंच सख्या पाहीं ॥
सिंधुदुर्ग हा, विजयदुर्ग हा, ही अंजनवेल ।
दर्यावर्दी मर्दुमकीची ग्वाही सांगेल ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं ॥ ४ ॥

तुझ्या भुकेला वरी नागली आणि कणीकोंडा ।
वहाण पायीं अंगि काम्बळी उशाखालिं धोण्डा ॥
विळाकोयता धरी दिगंबर दख्खनचा हात ।
इकडे कर्णाटक हांसतसे, तिकडे गुजरात ॥
आणि मराठी भाला घेई दख्खन-कंगाल ।
तिकडे ईस्तंबूल थरारे तिकडे बंगाल ॥
ध्येय जें तुझ्या अंतरीं ॥ ५ ॥

रायगडावर माय जिवाची गवळण विनधोक ।
झोंक हिरकणी नांव ठेवुनी जाइ रोख ठोक ॥
करीत पावन अर्पुनि पंच प्राणांचा पिंड ।
हिर्डस मावळचा श्रीबाजी, ती पावन खिंड ॥

करी रायगड रायरिचा तो जिजाइचा तान्हा ।
कोंढाण्याचा करी सिंहगड मालुसरा तान्हा ॥
रसवंतीच्या पहिल्या बाळा मुकुंद राजाला ।
पहिला वहिला अष्टांगानीं, प्रणाम हा त्याला ॥
शहर पुण्याच्या, शिवनेरीच्या, पंढरिच्या देशा ।
पुंडलिकाच्या, शिवरायांच्या, टिळकांच्या देशा ॥
अनंत कोटी ग्रंथ रचुनिया जोडि तुझ्या नामा ।
वाल्मीकीचें शतकोटी यश विष्णुदास नामा ॥
मयूर कविच्या पूर्ण यमकमय महाराष्ट्र देशा ।
कवि * कृष्णाच्या निर्यमका हे महाराष्ट्र देशा ॥
देवी ज्ञानेश्वरी करि जिथें भक्तीचा खेळ ।
तिथेंच गीतारहस्य बसवी बुद्धीचा मेळ ॥
जिथें रंगली साधी भोळी जनाइची वाणी ।
तिथेंच खेळे श्रीपादांची + कलावती वाणी ॥
विकावयाला अमोल असली अभंगमयवाणी ।
करी तुझी बाजारपेठ तो देहूचा वाणी ॥
तुला जागवी ऐन पहाटें गवळी गोपाळ ।
धार दुधाची काढित काढित होनाजी बाळ ॥
मर्दानी इष्काचा प्याला तुझा भरायासी ।
उभा ठाकला सगन भाउ हा शाहुनगरवासी ॥
प्रभाकराची जडण घडण कडकडित ह्मणायाला ।
दो हातांचा मुजरा माझा तुळशी रामाला ॥

---

* केशवसुत

\+ श्रीपाद कृष्ण कोल्हाटकर

भीमथडीहुनि चहुंमुलखांवर फिरले धारकरी ।
भीमथडीवर चहुं मुलखांतुनि जमले वारकरी ॥
आळंदीच्या ज्ञानोबांची भिंत घेत धांव ।
पुंडलिकाचे नांव चालवी दगडाची नांव ॥
बोल घुमट घुमवीत सारखा नवलाची भाक ।
जेजूरीवर चढी पायरी उभी नऊ लाख ॥

---

## २ हालत्या पिंपळपानास.

### [ मनोरंजन ]

[ राहत्या घराच्या खिडकीसमोर पिंपळाचें पान वाऱ्यानें सारखें फडकत होतें. परमेश्वराच्या इच्छेवांचून पानसुद्धां हलत नाहीं, या लौकिक श्रुतीवरून पुढील विचार सहजच मनांत वावरूं लागले. ]

कोंवळ्या हालत्या चिमण्या पिंपळपाना !
कल्पना हले तुज बघुनि असें हलतांना !
निजशाखेच्या या शेवटच्या टोंकाशीं
कां इकडुनि तिकडे सांग सारखें फिरशी ?
हा हिरवा, तांबुस रंग काळसर कांहीं,
तूं भिरभिर फिरतां स्पष्टभेद नच राही.
या झुळझुळत्या वाऱ्यानें नाचसी,
कोंवळ्या सूर्यतापानें तळपसी,
आपल्या मिश्ररंगानें झळकसी,
तुजकडेच माझें लक्ष्य सारखें लागे,
बांधिलें तयाला गूढ कांहिं अनुरागें !
जीं गूढ अप्सरोगीतें नभिं पाझरतीं,
तीं वाहत येतीं खालीं वाऱ्यावरती !

१००६

ऐकुनी तयांचे सूर मुके नवलाचे,
या हृदयकंपनें जीव काय तव नाचे ?
कीं जगीं ताप जो सारा उसळला,
रवितेजामाजि भरारा मिसळला,
लागतां तयाचा वारा, कोमला,
थरकांप होत हा तव कोमल देहाचा !
वद नाच भीतिचा कीं हा आनंदाचा !
हें तुझ्याच दुःखें हृदय असें तडफडतें,
विश्वैक्यवृत्तिची ध्वजा काय फडफडते ?
तूं स्वयें हालसी, कीं, तुज कोणी हलवी ?
सुखदुःखीं झुलसी स्वतां इतर कीं झुलवी ?
कळतसे तुझें तुज का हें हालणें ?
कीं दुसऱ्यांसाठीं आहे चालणें ?
कीं भावावांचुनि पाहे डोलणें ?
तव अस्तित्वाचें ज्ञान असे का तुजला ?
तुज इच्छातृप्ति क्रियाभेद का कळला ?
तुजभंवतीं जी ही सृष्टि असे पानांची,
कल्पना असे का तिला तुझ्या नाचाची ?
रस एकच तरुचा तुह्मांमधूनी वाही—
सुखदुःखभाव ही जोडि तुह्मां कीं नाहीं
विश्वेच्या विश्वें सारीं यापरी
स्थलिं भिन्न, भिन्न आकारीं, भूवरी
नांदती गड्या कांतारीं कितितरी!
जाणीव तुह्मांला परस्परांची कां रे
जीवैक्य असे कीं, भिन्न भिन्न जग सारें ?
क्रम हाच काय वद तुझ्या जीवनाचा रे ?

परिणाम करित का सृष्टीवर हें सारें ?
कुणि चित्रगुप्त हें लिहून ठेवित आहे ?
कीं स्वैरनदाच्या ओघावर हें वाहे ?
हें अवश्य जग चालाया का असे ?
कीं नसत्याहुनिही वायां हें पिसें ?
स्फूर्तिची कुणाच्या काया हलतसे ?
मम नयनिं चित्रसम जाउनि बैसायांचें,
इतुकेंच कार्य कां सांग तुझ्या नाचाचें ?
मम करीं कपाळीं दुर्दैवाच्या रेषा,
मजसाठिं लिहिति चिरदुःखभोग हा पेशा !
परि असति तुझ्या तर रेषा साऱ्या अंगीं,
दुःखही असें का तितुकें त्यांच्या संगीं ?
कीं वाऱ्यावरच्या ताना यापरी
उमटल्या अशा फिरतांना, तुजवरी !
त्या फिरुनि फिरुनि घेतांना अंतरीं--
निजनादब्रह्मीं गुंग होउनी डुलसी !
तें गीत आंतल्या आंत ऐकुनी खुलसी !
कीं दुर्दैवाच्या किंकाळ्या, या ताना,
तव कोमल हृदयीं ठेविति वण जातांना ?
खालतीं पडुनि मग मातिंत मिसळुनि जाया,
तूं तडफड करिशी अशी भूमिवर याया ?
परि थांब, जरा गा गाना तोषदा,
ऐकवीं माझिया कानां एकदां;
स्थिर राहि न पिंपळपाना ! तूं कदा.
मज गाऊं दे, मज नाचूं दे, तुजसंगें,
सुखदुःख सारखें सेवूं मानसरंगें ।

संबंध असो वा नसो आपणांमाजी,
मी एक कारणासाठीं तुजवर राजी.
नवबालाहृदयीं प्रीति नवी हलतांना
तच्छिरीं हलसि तूं तसाच पिंपळपाना !
जीं हृदयकंपनें सारीं मानसीं,
तीं आह्मांतें बाहेरी दाविशी !
निर्दोष मनानें भारी हालसी,
कुणि बाला जरि मज देइल असला मान,
तरि सुखें च होइन मीही पिंपळपान !

---

## ३ चिमुकली कविता !

### ( मनोरंजन )

नाजुक सुंदर गोंडस चिमणी बाला दशवर्षा
कोण कुणाची कुठें चालली उधळित ही हर्षा !
हात चिमुकले, पाय चिमुकले, चिमुकलाच बांधा,
भूदेवी-स्वर्देवी यांतिल हाच काय सांधा !
धवलवर्ण हा देहावरती फुलत्या पुष्पाचा,
लाल छटा वर, जणूं पसरला रसचि गुलाबाचा !
त्याच फुलांच्या वळुनि पाकळ्या पोकळशीच घडी,
झालि तीच वाऱ्यावर हलत्या ओंठांची जोडी !
सडा पसरला आंत कावळ्या बारिक मोत्याचा,
ओंठाआडाचि अर्धा पडला खेळ पहा त्यांचा !
इवलीशी हनुवटी गोजिरी, खळी तिच्यावरि ही,
निजहृदयिंच उतराया वर्तुळ मुख जणुं लांबवि ही !
सरल नासिका चांफेकळिचा जणुं अंतर्भाग,

दळांआड दडलेला परागमय अवकाशांग.
कपाळपट्टी विशालतेचें बालरूप पहिलें,
कुणा भाग्यवंताचें भावी भाग्य त्यांत लिहिलें ?
किंचित् खुलत्या भिवया--चिमणी धनुष्येंच साचीं
चित्रपटांतिल काय चिमुकल्या रामलक्ष्मणांचीं !
नखाएवढ्या दोन हिरकण्या हंसती--त्याखालीं,
तेजोरूपा श्रीकमला जणुं निजकमलीं रमली !
फुलें बसविलीं वेलींवरती, गगनीं तारांना
त्याच मुहूर्तीं त्याच करें का विधि कारि या नयनां
किरणां किरणां टाकुनि भवतीं या नेत्रांमधुनी
पापस्पृष्टा वसुंधरेला बाला का न्हाणी !
अभ्यासास्तव सोडित उघडुनि नयनांची खाण
बालमदन निर्दोष किरणमय हे बोथट बाण !
केंस कोंवळे सरळचि काळे, कुरळेही कांहीं,
तुळतुळीत मोकळे; मनासम नच बंधन त्यांहि !
गालिं लोळती कांहीं, कांहीं कानांवर पळती,
पवनीं खेळति कांहीं किंवा मानेवर ढळती,
पाशरूप पुष्कळसे परि ते पाठीवर रुळती,
चकचकीत जणुं लहरि जलाच्या पवनें झुळझुळती !
बालसर्प जणुं, अथवा उपमा कुणीं अशी द्यावी ?
तच्छिरिं बसवुनि साप निजशिरीं पाप कोण बसवी ?
तळपति जललहरी रविकिरणीं जणूं जागजागीं,
उंच सखलशा सुटत्या वेणीच्या बंधनभागीं.
झुळझुळ मंजुळ वाहे चिमणा ओघ जसा कांहीं,
गमते रमते उगमस्थानीं ही कृष्णाबाई !

गाल कोवळ्या गुलाबकळिचीं रूपें विधिमनिंचीं,
पदार्थसंसर्गाविण नुसत्या चिंतनमय खनिचीं !
लज्जा निर्मायाची स्फूर्तिच विधिनयनीं चमके,
त्या नयनांनीं बघतां गालीं लाली ही फडके !
चुंबन घेतां येतिल गालचि हे श्वासासरसे
वाऱ्यावर वाहुनीच चुंबक ओंठासह खासे !
सहज मुखावर हंसें खेळतां गालीं गोड खळ्या,
फुटती मुग्धचि आनंदाच्या तयांतुनी उकळ्या !
ओंठ कशाचे- देंठचि फुलत्या पारिजातकांचे;
हास्यरसाचे करी मोगरा सांचे कलिकांचे !
कां हंसतें सारखी अशी ही ? नेत्रहि हंसती कां ?
फुलें झेलिं चालतीबोलती ललितदला लतिका !
कीं भावी प्रणयाचें अत्तर हृदयपुष्प पिळुनी--
बालमदन करि; उडे हास्यमय सुवास दरवळुनी.
किंवा कांहीं क्रियाच इजला येत नसे दुसरी ?
निष्कारण ह्मणुनीच सदाची मुद्रा ही हंसरी !
नखें पदतलीं, कीं, वर्खांच्याटिकल्या चकचकत्या,
कापुनि कचीं पोंवळींच मृदु केल्या का चकत्या !
करांगुलीमधिं बालमुद्रिका विराजते भद्रा,
पवित्रतेच्या सम्राटाची हीच राजमुद्रा !
तिलक गोजिरे गोंदवणाचे हिरव्या रंगाचे,
शुभ्र मुखावर तुषार कुठल्या दिव्य तरंगांचे !
निळया नभीं वर शुभ्र तारका जमवितात मेळ,
शुभ्रमुखनभीं इथें निळयाशा तारांचा खेळ !
इच्या उद्यांचा धनी कोण, हें ठरवावें ह्मणुनी,
पुण्याईचें गणित करित विधि दशांशचिन्हांनीं !

लाल छटा वदनिंची नभींच्या शुभ्र मौक्तिकांत,
कोर बालचंद्राची विलसे संध्याहृदयांत !
रक्त कपालीं दिला रक्ततर कुंकुमातिलक बरा,
अरुणपटावर मांगल्याचा नव मंगलतारा !
चिमण्या देहा शोभविणारी चिमणीशी साडी
नीटनेटकी नेसवुनी हिस कोण कुठें धाडी ?
घालित बाला चित्रिंचेच का चित्र अलंकार,
स्वप्नांतिल संसार कुणाच्या घे कीं अवतार !
केला विधिनें स्त्रीत्वाचा हा टीचभराचा नमुना;
नवतीर्थास्तव हिंडति संगततनु गंगायमुना !
गर्भजन्म या उपाधि भोगी कीं हीं तदतीता
कीं भूमींतुनि अशीच वर ये ही दुसरी सीता !
उषा--चंद्रिका जणूं भेटल्या; त्या संगमकालीं
तांबुस धवलहि रस पाझरतां काय त्यांत न्हाली !
किंवा स्वर्गांतुनि ही सुटुनी आली आतांच,
नंदनवनिंचा मंद वात तरि करि भंवतीं नाच !
महाकवींच्या कल्पनेंतली भावमूर्ति का ही ?
बलवत् भावें स्फुटतर होउनि वस्तुरूप वाही !
पहा थांबली विभ्रमललिता सलीलगति बाला,
बालभाव मनिं विमल, जोडि करयुग परमेशाला,
अहा ! कोणता भाव असे हा पापमना न कळे !
द्रवुनि भक्तिनें आत्मा सारा देहीं कीं खेळे !
देवमनीं निजभक्ताविषयीं वसे भावना जी
भावरूप ती काय खेळते या हृदयामाजीं ?
शुद्ध भाव हा तिच्याच मनिंच्या पुण्याचा वारा,
हाच भाव भगवंता ! आतां जगत्त्रयीं पसरा.

सं. आर्प ५५७२

हात जोडुनी बिसले बाळे ! मागितलें काय ?
स्फूर्तिनेंच कीं पावित्र्याच्या नत झाला काय !
जें पावन, जें विशुद्ध, त्याची तूं मंगलमूर्ति,
देव कोणती करील आतां तव आशापूर्ति,
तुझ्या मनींचा विमल भाव हा कळतां तया क्षणीं !
दगडाच्या देवही वांकविल देह तुझ्या चरणीं !
स्वर्गहि तुजवर धरिल सारखा दिव्याची गळती !
त्वद्दर्शनपुण्याला मुकले गतमुनि हळहळती !
तीर्थें, पुण्यें, देवदेवता, ज्यां पाहुनि पळती,
तसलीं पापें नेत्रकिरण तव पडतां क्षणिं जळती !
टाक नजर एकदां तरी ती या पाप्यवरती–
स्वर्गीं सहज तरि जाण्याइतकी पुण्याची भरती.
शुद्धभाव--परिपूर्ण मनीं क्षण मजला जाऊंदे,
कवित्व पावन करुन घ्याया जराच राहूंदे.
ओघ एकदां त्या कवितेचा जगांत वाहूंदे,
नांव तरी पापाचें उरतें का मग पाहूं दे !
मम हृदयाच्या हिंदोळ्यावर चल ये घे झोले,
त्यांतुनि निघत्या कवनश्वासें विश्व सहज डोले !
कवनस्फूर्ती, मंगलमूर्ती, जराच धांव गडे !
दिव्य सुधारस वर्षू जगतीं ये जिकडेतिकडे !
अहा ! चालली बाला टाकुनि मज संशयवादीं
रंगत गुंगत दंग सदा ती आपल्याच नादीं !
नवल न तिजसह नेत्र जरी मम हे भिरभिर फिरती,
भुलतें, खुलतें, डुलतें, झुलतें विश्वाचि तिजभवंतीं !
पावित्र्याची उषा काय, कीं, कळी पूर्णतेची
आशीः कीं ही जगास पुढच्या प्रभुतन्मयतेची !

किंवा कांही तरल कल्पना कुणास आठवली,
नटवावी कशि कवनीं ती या विचारिं मति रमली;
तोंच चुकवुनी डोळा धांवे कल्पनाच बाल
स्वच्छंदानें पांघरल्याविण शब्दांची शाल !
पवन पिउनि मग तिची होत का अशी बालमूर्ति
बाला कसली खास, तीच ही नवकवनस्फूर्ति !
भरभर फिरते मग वाऱ्यावर ताराया जगता
कुण्या कवीची चुकलीमुकली चिमुकलीच कविता !
मूर्तिमती कविताच यापरी हृदया हालवितां
'गोविंदाग्रज'ही गाई मग चिमुकलीच कविता !

---

## ४ अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस.

### ( मनोरंजन 'वसंत' १९१४ )

मध्यरात्रीच्या सुमाराला कोकिळेचा शब्द, विषण्ण व निराश हृदयाला किती सांत्वनपर वाटतो, याची सुखनिद्रित मनाला साक्ष पटणार नाहीं !]

अवेळ तरिही बोल--कोकिळे--अवेळ तरिही बोल !

रात्र पसरली जगतावरती,
कुरके काळे मेघहि फिरती,
वारा वाहे भरभर भंवती,
बालचंद्रचंद्रिका घाबरी गोरीमोरी होत;
उदासीनता छाया पसरी,
सृष्टि दिसे जरि वरुनी हंसरी--
खिन्नताच तरि अंतरिं सारी,
व्यर्थ बोलतो, व्यर्थ डोलतो संसाराचा गोल !
आनंदाच्या प्रातःकाळीं,
दिवसाच्या गजबजल्या वेळीं,

किंवा संध्या जेव्हां नटली,
आनंदांची गाणीं गाया गवई लाखकरोड !
असतां आनंदाची माया,
वृद्धि क्षणभर तिची कराया
लागे ज्याचा तोच गावया,
आनंदाला द्विगुणित करिती आनंदाचे बोल !
परंतु जेथें उदासीनता
व्याकुल करिते विषण्ण चित्ता
तेथें त्याला द्यायां समता--
गाणें गावें, हेंच अलौकिक ईश्वरतेचें काम;
बाह्य सृष्टि जरि निद्रा भोगी,
अंतःसृष्टि तरी हतभागी
रडते तशीच राहुनि जागी,
निजवाया तिजलागीं असलें गाणें गाई गोड !
अवेळ येथें कसली बाई ?
दुःखसांत्वना गा केव्हांहि !
अनुकंपेला नियम न कांहीं !
रित्या मनीं या ओत सूर; त्यां जाऊं दे अति खोल;
वळवाचा हा वारा गार
झोंबुनि पीडा देई फार,
येत गवाक्षांतुनि अनिवार,
येतां जातां सूर काढितो भलभलते भेसूर !
खिन्न चांदणें ढगांआडचें
भग्न मनोरथ झाले ज्याचे--

हंसें जणूं तें अशा मनाचें,
पुष्पवतीच्या तोंडावरची छाया काय उदास !
या अवकाळीं--या एकांतीं
निद्रेची मिळवाया शांति
थकुनी भागुनी पडलों अंतीं,
निद्रा कुठली परि त्या हृदया, भविष्य नाहीं ज्यास !
हातीं संसाराची माती,
मनिंच्या आशा मनाच खाती,
भूतकाळचीं भूतें रडतीं !
मिटल्या जाग्या डोळ्यांपुढतीं शून्याचें मैदान !
निष्प्रेमाची शेज सोबती,
भयाण दुनिया सारी भंवतीं,
विषण्ण येती विचार चित्तीं,
बाह्यांतर विश्वांत खेळते उदासीनता एक !
गा तर चित्ता मम रमवाया,
हीच खरी जादूची माया;
आनंदा खेळविणें वाया
मशाल दिवसा लावुनि होतो लाभ कुणाला काय ?
दूर कराया उदासीनता
गाच गडे ! अंगाईगीतां
झोंप येउं दे माझ्या चित्ता,
लक्ष्य लागतें सुरांकडे तव; वाटीत ते बिनमोल !
पाहुनि ही तव दयाशीलता
द्रवेल कोणी भगिनी माता,
शांत कराया हताश चित्ता--
रुक्ष जगावर स्त्रीहृदयांतिल टाकिल अश्रू एक !

त्या अश्रूच्या शीतलतेनें
भोंवतालची आग जाळणें,
निद्रा घेतां शांत मनानें
'गोविंदाग्रज' ऐकत राहिल गुंगींतहि हे बोल !
कोकिळे ! अवेळ तरिही बोल !

ग्रंथ संग्रहालय क्र. ता

---

## ५ कलगीचें गाणें.

### [ मनोरंजन. ]

( तमाशांत कलगीच्या सवालाला तुऱ्याचा जबाब मिळतो, जगाच्या तमाशांत तरीं तसें कां नसावें ? )

बोल बोलतो सलगीचें-गाणें माझें कलगीचें ? ॥
एक वेळ जी आवडती । सारंगी माझी होती, ।
नानापरिचे सूर तिचे । निघती कितितरि गमतीचे. ।
काळ पुढें तो परि गेला । आनंदहि कांहीं मेला, ।
नवी नवाई-कायम नाहीं-थोडी राही
पुढें सुरानें नच रमवी । स्मृतिनें परि त्यांच्या भ्रमवी!॥
असाच बसलों कुठें तरी । सारंगी घेऊन करीं, ।
खेद मना जरि बहु झाला । आशा होती फार मला- ।
धिन्ना धिन्ना धिन्नकना । प्रसन्न करितिल खिन्नमना, ।
ही सारंगी-रंगुनि रंगीं-चित्त तरंगीं
हलविल मनिच्या तारांना । काढिळ नानापरि ताना ?॥
ढोल नगारे मजभंवतीं । नाना नादें परि रडती, ।
त्यांची पोकळ ओरडती । एकपणाची करि माती, ।
गरीब माझी सारंगी । मुळीं खुलेना हमरंगी, ।
सूर जमेना-चित्त रमेना-मज करमेना

विरमेना रव भवंतींचा, । खेदहि माझ्या चित्तीचा ॥
दाटी केली तों गगनीं । कृष्ण भयंकर मेघांनीं, ।
स्वैरपणें हृदयीं शिरले । मस्तकांतही ते भरले ।
कडकडाट त्यांचा भारी । धुकें पसरलें बाहेरी, ।
मन घाबरलें–बहु बावरलें–भटकत फिरलें
काहिं सुचेना समजेना । कांहिं रुचेना उमजेना ! ॥
मेघांच्या छाये सरसें । काळोखाचें राज्य दिसे; ।
दाट तमाच्या तेजांत । नाहिंपणाचा गिरि दिसत; ।
काळोखाच्या किरणांचे । कांटे खुपती मग साचे; ।
वाटे क्षणिं परि–गिरिशिखरावरि--बाळ एक धरि
मंजुळ गाण्याचे धेर । ऐकीवाच्या बाहेर ! ॥
मेघांच्या थैमानानें । क्षणांत विसरे परि गाणें, ।
कल्लोळाच्या मग नादीं । यत्न करी मी संवादीं, ।
पडुनी भलत्या अशाभरीं । सारंगी मी-न धरी करीं, ।
परि तें गाणें–मधुनि ऐकणें–पुन्हा विसरणें
रचणें काळोखावरती । मग वाऱ्याच्या इमारती ! ॥
मेघांच्या गर्जनेसवें । मीहि ओरडे दीर्घ रवें; ।
ढोल नगारे बेसूर । त्यांतच मी मिळवी सूर, ।
आशा ऐसी मन भावी । सातसुरां मिळणी व्हावी; ।
अखेर फसलों–उगाच बसलों–भयाण हंसलों
सूर भिन्न एकेकाचा । एक भाव तेथें कसचा ! ॥
यत्न करी मग अखेरचा । सूर धरी सारंगीचा; ।
भेसूराचें संगीत । ऐकाया आत्मा भीत ! ।
संतापानें भूमिवरी । सारंगीचा चुरा करी ! ।

भान गळालें–ऐक्य पळालें–सूर जळाले
झालें गोडीचें काळें । तारांचें झालें जाळें ।।
हृदयीं मेघांची गरदी । दंग असे भीषण नादीं, ।
नाहिंपणाचा डोंगर तो । अंधपणें पाहत होतों; ।
मधुनि मधुनि त्या बाळाचें । गाणें चालें भासाचें; ।
वृत्ति बावरी–रडे बिचारी–ऐकाया तरि
नसत्याच्या पडद्या आड । गमें बाळ दडलें द्वाड !।
स्थितींत या त्या मेघांचा । कडकडाट हो शेवटचा; ।
तोंच कडकडे वीज भरे । अवसानाचें ये वारें; ।
धुकें पळालें फार जवें । मेघ जळाले जळासवें; ।
वृत्ति रंगली–फारच रमली–हर्षें रडली
उफराटी सारी सृष्टी । मेघाविण झाली वृष्टी !।।
खरे पणाचा पाऊस । स्वच्छ धूत काळोखास; ।
दाट तमाचें तेज बनें, । गेलीं ती काळीं किरणें; ।
सारंगी तों करी हंसें । नवल जशीच्या तशी असे !।
समोर डोंगर–परि शिखरावर–बाळ मनोहर
स्वच्छंदें गाणें गाई । सूर सूर ऐकूं येई !।
वृत्ति ऐकुनी थरारली । सारंगी वाजवुं सजली, ।
सात सुरांस्तव ती वेडी । मुदें तिच्या तारा छेडी !।।
सूर एकची निघे परी । पहिल्याहुनि किति गोड तरी !।
सुराबरोबर–विरला डोंगर–शिरवर तळावर
नाहींचें नाहीं झालें । बाळ गात पुढती बसलें !।।
ढोल नगारे ते पहिले । पहिल्या परि चालूं झाले; ।
गाण्याचे परि या सूर । पोकळपण करिती चूर !।
वृद्ध वधूचें हो खासें । बाल वराशी लग्न असें !।

ग्रंथ ... नं. ... ता. ...

त्या जोडीचें–अपत्य साचें–गाणें अमुचें
उपजे बाळापरि–नादीं । पितरांच्या जन्माआधीं ! ॥
ढोल नगारे एकसरी । त्या लग्नाचीं वाजन्त्रीं; ।
सुमुहूर्ताचा क्षण फुटुनी । युगें निघालीं त्यामधुनीं ! ॥
बाळचितें गाई गाणें, । नवरामुलगा मन्त्र म्हणे; ।
नव्याजुन्याचें–उण्यापुऱ्याचें–असेंनसेंचें
लग्नचाललें चौफेर । सारंगी मम आहेर ! ॥
साथ कराया गाण्याशीं । सारंगी घे हातशीं; ॥
"गा तूं करील साथ भुला ! । माझी सारंगी तुजला" ॥
परीबाळतें स्वच्छंद । गाणें करि अपुलें बंद ! ।
बाळक रुसलें–पळत चाललें–अन्धुक झालें,
माझी सारंगी म्हणतां । मुकेपणा वरि-तें नसतां ॥
वेड लागलें गाण्याचें । आर्जव केलें बहु त्याचे ! ।
"बाळा गारे गाच पुन्हां, । गाण्यावांचुनि प्राण–सुना !
माफ करी कसलाहि गुन्हा, ।गाच, गाच, परि गाच पुन्हां! ॥
पायां पडलो–चुकलो ! वदलो–अखेर रडलो
राग तयाचा जाईना ! । कांहीं केल्या गाईना ! ॥
"जपलो जीतें जिवापरी । सारंगी ही तूंच धरीं !" ॥
ऐकुनि आनन्दें हंसलें । बाळ पुन्हा गाऊं सजलें! ।
एकपणा भिन्नत्वाचा । जीव तोंच त्या गाण्याचा ! ॥
चिरकालींचे–मखमालीचे–मऊ गालिचे
केले माझ्या हृदयाचे । गाणें मग त्यावर नाचे ॥
बाळ सारखें गात-पुढें । गाण्यामाजीं जीव बुडे ।
सर्वांगीं–तें विष भिनलें, । सुख मरणाचें सां डलें, ।
ऐकत असतां मी मेलो, । प्रेतावरि माझ्या बसलो ! ॥

भान न साचें—आजउद्यांचें—मग आतांचें
दिवस वाटले जायाचे। प्रेताच्या आयुष्याचे !॥
चहूंकडे गाणें भरलें,। सारंगी गाणें झालें,।
मूर्तभाव ये गाण्याला। धरीनसें गमजे मजला; ।
धरावया जो हात हले। हाताचें गाणें झालें !।
कानांचेंही—दृष्टीचेंही—गाणें होई !
मजला मी पाहूं गेलों तों मीही गाणें झालो !॥
गाणें झालें सर्वांचें। गाणें झालें काळाचें;।
गद्याचें गाणें सगळें। गाण्याचें गाणें झालें;।
गाण्यानें मग त्या गाणें। गाण्यानें ऐकत बसणें;।
नादब्रह्मीं—जिरला "तुम्ही"—जिरलो "आम्ही"
ऐकतांच ऐके त्याचें। झालें जें ऐकायाचें!॥
स्वार्थ नसे ना परमार्थ,। गाण्याला कुठला अर्थ ?।
वृत्ति जाहली चवचाल,। गाण्याला नुरली चाल !।
ध्रुवपदिं गाणें जें सारें। ध्रुवपद मग कसलें बारे !।
गाण्यांतचि जिरतां काळ। गाणें सहजति बेताल !।
क्षणिं शब्द सुरे--क्षणिं राग हरे--मग नाद भरे,
फुकट नव्हें बा-तें गाणें। करिशिल मग "गाणें गाणें!"॥
बोल बोलले सलगीचे। गाणें माझें कलगीचें !।
तोच तयावरि करिल तुरा। वेडा जो मनिं खराखुरा !।
खराखुरा परि पुरापुरा। असला वेडा करिल तुरा !।
गा जगतानां—गा मरतानां—मर गातानां
मरुनिं सदाही गाच परी। गाणें मरणें एक करी ! ॥
स्वप्रेतावरि जो बसतो,। तुझ्या ठायिं मजला बघतो; ।

गाण्यामाजीं दोघांनां । पाहुनि घेइल जो ताना ! ।
त्याला हें देतो गाणें । अर्थ जयाला मनिं बाणे; ।
आदिहि गाणें–मध्यहि गाणें–अंतहि गाणें
असलें गाणें मिळे नवें । काय याहुनी तुला हवें ! ॥
होतें गाणें जरि माझें । आतां झालें तेंच तुझें ! ।
तुझें तरी परि तें कसचें ? । गाणें झालें सर्वांचें ।
जाणें तें गाणें साचें । गाणें असलें कोणाचें ? ।
सवाल घ्यारे–पुढे सरारे–तुरा करारे !
बोल संपले सलगीचे । गाणें माझें कलगिचें ! ॥

## ६ प्रेमाचा प्रलयकाळ.

( ही कविता "गोविंदाग्रजांच्या मृत्यूनंतर एक वर्षानें 'नवयुगाच्या' गडकरी अंकांत ( फेब्रुवारी १९२० ) प्रसिद्ध झाली ! वर वर वाचल्यास जरी ही कविता प्रथम दुर्बोध वाटते तरी जरा काळजीपूर्वक परिशीलन केल्यास त्यांतील माधुर्य व गडकऱ्यांचें भावप्रधान तत्वज्ञान उघड होतें. )

( बुद्ध, तुकाराम, नानक, ख्रिस्त यांच्या मनाचेंगाणें असेंच असावें. )
चला चलारे चला चला ॥ विसरुनि विश्वा चला चला ॥ध्रु०॥
पूर लोटला प्रेमाचा । प्रळयकाळ हा विश्वाचा ॥
लोट सारखा उचंबळे ॥ आतां कसला ओघ खळे ॥
स्वार्थाचे तट हे फुटले ॥ चहूंकडे पाणी सुटलें ॥
फुटकी होडी ॥ टाका उपडी
सोडुनि साऱ्या मोहाला ॥ चला मिळूं या ओघाला ॥ १ ॥
अलोट प्रेमाचा पूर ॥ धरणें करि सारीं चूर ॥
विश्व बुडालें पाण्यांत ॥ या प्रळयाच्या लाटांत ॥
अथांग पाण्याचा अंत ॥ जाणि एक तो भगवंत ॥

पाणी इकडे ॥ पाणी तिकडे ॥
पाणी पाणी चहूंकडे ॥ आतां लपतां कुणीकडे ॥ २ ॥
खडक बुडाले गर्वाचे ॥ विरले डोंगर रागाचे ॥
खंदक जिरले द्वेषाचे ॥ कडे मोडले त्वेषाचे ॥
जीव कोंडला आशेचा ॥ श्वासाचें बंद निराशेचा ॥
प्रेमजलाचा ॥ हृदयरसाचा ॥
सागर करि तांडव-नाच ॥ प्रळयकाळ तो बा हाच ॥ ३ ॥
दिशा दहाही खळबळल्या ॥ सीमा त्यांच्या विरघळल्या ॥
त्रिवेणिसंगम काळाचा ॥ मागें पुढें न व्हावयाचा ॥
रजनीचा पडदा धुतला ॥ दिवसाशीं तन्मय झाला ॥
पांचहि भूतें ॥ पञ्चत्वातें– ॥
गला; गिळिलीं प्रेमबळें ॥ त्रिगुणांचा रंगहि निवळे ॥ ४ ॥
पाण्याच्या चढत्या लाटा ॥ उचंबळति बारा वाटा ॥
पृथ्वी सूर्य ग्रह तारे ॥ बुडबुडेच त्यावर सारे ॥
प्रकाश वरचा फेन असे ॥ तिमीरनीलिमा आंत नसे ॥
एकाकारें ॥ विरलें सारें ॥
पहा पहारे पहा पहा ॥ प्रळयाची ही मौज अहा ॥ ५ ॥
पाहणारा परि कोण उरे ॥ जेथें सर्वचि विश्व मुरे ॥
हृदयाचें पिंपळापान ॥ आत्मा माझा भगवान ॥
बाळरूप निजलें शांत ॥ उठविल त्याला कल्पांत ॥
चला तोंवरीं ॥ आपण सारीं ॥
प्रेमाच्या या प्रळयांत ॥ उडी घालुंया निमिषांत ॥ ६ ॥
जन्म इथें मरणा जाई ॥ जन्म इथुनि मरणा नाहीं ॥
सर्वांवर फिरतां पाणी ॥ कोणास्तव रडणें कोणी ॥
हृदय सागराच्या लहरी ॥ पोहत आत्मा तथांवरी ॥

विश्व बहिरलें ॥ विश्व महिरलें ॥
प्रेमजलाचा भडिमार ॥ करि जीवा गारीगार ॥ ७ ॥
शिरविश्वाचा अवतार ॥ या पाण्यामधली गार ॥
विरुनि जाऊं द्या एकसरें ॥ जिरुनि जाउं द्या प्रेमभरें ॥
समा होउं द्या भरतीची ॥ एकसारखी चढतीची ॥
अखंड राही ॥ अखंड वाही ॥
प्रेमसागरा ! तव भरती ॥ चढवि सदा वरती वरती ॥ ८ ॥
प्रेमसागरा तव लहरी ॥ उडवी अजुनी वरी वरी ॥
अफाट लाटा नाचीव ॥ ब्रह्मवाद तो ऐकीव ॥
लाटांचें देउनि झोंके ॥ काळाची मिळवी टोंकें ॥
या बाजूला ॥ त्या बाजूला ॥
कुठेंहि मग मीं पडे जरी ॥ सर्व सारखें मला तरी ॥ ९ ॥
थांबवील असला पूर ॥ कोण असा आहे शूर ? ॥
अनंतास देउनि वळसा ॥ ब्रह्माच्या जाईन कळसा ॥
[illegible] मम हृदयांत ॥ पूर्ण हरपलें अंशांत ॥
[illegible]लत जयजय ॥ डोलत थयथय ॥
[illegible]लीकडे ॥ प्रेमप्रळया जाच गडे ॥ १० ॥
[illegible]ळयाचें ॥ कुठलें तें संपायाचें ॥
प्रळयाच्या लाटा उडती ॥ गाण्याची कडवीं चढतीं ॥
ब्रह्मस्थितिची शून्य गति ॥ तिच्यांतुनि हीं गाणीं निघतीं ॥
स्वानंदाच्या ॥ ब्रह्मपदाच्या ॥
पूर्णपणाच्या पैलथडी ॥ गाण्याची जाईल उडी ॥ ११ ॥
ब्रह्महि स्वपदीं हालेल ॥ गाणें तरि हें चालेल ॥
शून्य कल्पनेहुनि खोल ॥ प्रेमप्रळयाचे बोल ॥
नका थांबवूं प्रेमाला ॥ नका थांबवूं गाण्याला ॥

REFBK-0001976
REFBK-0001976

हृदयचि हरलें ॥ शब्दहि सरले ॥
निःशब्दाच्या नादभरीं ॥ गाणे ऐकत रहा तरी ॥ १२ ॥
टाकुनिया चिद्राजीव ॥ प्रळयामाजीं द्या जीव ॥
अचेतनाच्या गुंगींत ॥ ऐका प्रळयाचें गीत ॥
मृत विश्वाचें तरावें ॥ कडवे चाले तेरावें ॥
कोणी निंदा ॥ कोणी वंदा ॥
प्रेमप्रळया प्रेमरसें ॥ 'गोविंदाग्रज' गात वसे ॥ १३ ॥

---

## ७ पहिलें चुंबन.

### [ मनोरंजन, जानेवारी, १९१२ ]

[ पहिलें फूल, पहिलें मूल, सर्व कांहीं पहिलें म्हणजे पहिलेंच ! तसेंच पहिलें चुंबन ! पहिल्याची अजब जादू दुसऱ्यांत नाहीं ! ]

[ **चाल**–श्रवणांत पेरणी केली इ० ]

जें मनास शिवलें नाहीं । ठावें न कल्पनेलाही । सुख असें ।
जें दिसे न कवण्या जागीं । जे अवर्ण्य वाणीलागीं । सुख असें ।
विताही प्रतिभाशाली । कल्पितां जयातें थकली । सुख असें ।
एकदा–। कष्टतां सदा । पुढतिं नच कदा–।
अनुभवा येई । तें पहिलें चुंबन देई । सुख असें. ॥ १ ॥
चित्रांतम रमणी बसली । नवयौवनशोभा ठसली । तन्मुखीं ।
करिं ठेवुनि कोमल गाला । करि विचार नकळे कसला । सारखी ।
डोले ना अथवा हाले । मग कुठलें बोले चाले । चित्र तें ।
रंजना । मुग्धयौवना । करित कल्पना ।
भावि कालाची । ( तुज ठावें ) त्या दिवसाची । दिवस तो ॥ २ ॥
चित्र हें पाहुनी असलें । नेत्रांचें सार्थक झालें । वाटलें ।
परि तरंग अद्भुत उठले । अनुभवा न पूर्वी आले । जे कधीं ।

जाउनी चोरट्या चालीं । झांकिले नयन करजालीं । न कळतां ।
संभ्रमें । दचकली गमे । त्वरित विभ्रमें ।
श्रमवि कर दोन्ही । काढाया नयनांवरुनी । मम करां ॥ ३ ॥
तों बघुनी उघड्या गाला । उन्माद मानसीं भरला । स्वैरसा ।
संमोह पडे नयनांला । मज विसर जगाचा पडला । क्षणभरी ।
ठेवुनि मुख सखिच्या गालीं । आणिली गुलाबी लाली । त्यावरी ।
हांसली । फार लाजली । दूर जाहली ।
एक निमिषांत । झिडकारुनि माझा हात । हंसतची ॥ ४ ॥
हा खेळ एक निमिषाचा । एकदांच अनुभव त्याचा । नच पुन्हां ।
तें वारें आलें गेलें । जन्माचें सार्थक झालें । परि गमे ।
तें निमिष, स्थिती ती, सुख तें । चित्ताच्या दृष्टिस दिसतें । सारखें
स्वानंद- । कमलमकरंद । सुधानिस्यंद ।
भूवरी आणि । जें वर्णावें तें कोणी । सुख तसें ॥ ५ ॥
एकदांच अनुभव त्याचा । आरंभ अंत सौख्याचा । एकदां ।
आयुष्य न त्याला क्षणही । जन्मही पुन्हां त्या नाहीं । एकदां ।
मनिं चटका लावायासी । पाठवी दैव जणुं त्यासी । एकदां ।
निशिदिनीं । वाटतें मनीं । नित्य जन्मुनी ।
मरण सोसावें ! । परि पहिलें चुंबन द्यावें । फिरुनिही

---

१८५